संक्षिप्त



कोल्हापूर : अंबाबाईच्या दानपेट्यांतील देणगी मूल्याची मोजदाद करताना देवस्थान व्यवस्थापन विभागातील कर्मचारी.

## अंबाबाईचरणी पावणेदोन कोटी दान; १२ दानपेट्यांतील देणग्यांची मोजदाद पूर्ण

**कोल्हापूर :** करवीर निवासिनी श्री अंबाबाईच्या दानपेट्यांमध्ये भाविकांनी एक कोटी ८५ लाख ८७ हजार ९०० रुपयांचे दान अर्पण केले. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्यावतीने मंदिर आवारात ठेवण्यात आलेल्या १२ दानपेट्यांमधील देणगीची मोजदाद सोमवारी पूर्ण झाली असून १५ मे ते १५ जुलै या गेल्या दोन महिन्यातील हे दान आहे. १६ जुलैपासून देवस्थान समितीच्यावतीने दानपेट्यांमध्ये भाविकांनी देणगीदाखल अर्पण केलेल्या रोख रक्कमेची मोजणी करण्याची प्रक्रिया सुरु होती. मंदिर आवारातील अभिषेक मंडपात चार दिवस पोलीस बंदोबस्तात सोमवारी २१ रोजी रात्री आठ वाजता मोजदाद प्रक्रिया पार पडली. यासाठी देवस्थानतर्फे ३३ कर्मचारी काम करत होते. मोजदादच्या पहिल्या दिवशी दि. १६ रोजी चार दानपेट्या उघडण्यात आल्या. दुसऱ्या दिवशी एक नंबरची पेटी उघडण्यात आली. तर तिसऱ्या दिवशी २ नंबरची दानपेटी उघडण्यात आली.



## पाण्यासाठी नागरिकांचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयासमोर ठिय्या

**अंबरनाथ :** जुलै महिन्यातच बहुतांश धरण भरून वाहू लागली असली तरी अंबरनाथ च्या बुवापाडा परिसरात नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असल्याने आहेर सय्यम सुटल्याने येथील नागरिकांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले. बुवा पाडा भागात कमी दाबाने आणि अनियमित पाणी पुरवठा होत असल्याने सामाजिक कार्यकर्ते अशोक शाह यांच्या नेतृत्वाखाली मजीप्राच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करून मजीप्राच्या धिकाऱ्यांचे लक्ष वेधले. यावेळी कार्यालयावर हंडा मोर्चा आणण्याचा इशारा देखील देण्यात आला. या आंदोलनात सामाजिक कार्यकर्ते बबलू सिंह यांच्यासह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. तर बुवापाडा परिसरातील पाणी पुरवठा सुरळीत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु असल्याचे लेखी निवेदन मजीप्राचे उप विभागीय अधिकारी किशोर शेकोकारे यांनी दिल्याचे शहा यांनी सांगितले.

## भर रस्त्यातील मेट्रोचे जिने काढण्याचे परिवहन मंत्र्यांचे आदेश

**ठाणे :** कासारवडवली ते वडाळा मेट्रोचे काम घोडबंदर रस्त्यावर सुरू असून या मेट्रोचे कासारवडवली आणि ओवळा या स्थानकांचे जीने हे महामार्गाच्या मधोमध उतरविले जात आहेत. यावर शिवसेना उबाठा गटाने आक्षेप घेतला होता. त्याची गंभीर दखल घेत परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी बैठकीत जिने रस्त्याच्या मधोमध न उतरता ते रस्त्याच्या दोन्ही कडेला उतरविण्याचे निर्देश एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांना दिले. तसेच घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडी लक्षात घेऊन दोन्ही बाजूला असलेले सेवा मार्ग हे ३१ डिसेंबर अखेर मुख्य रस्त्याला जोडण्याची सूचना केली आहे. मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या कार्यालयात ही बैठक आयोजित केली होती. यावेळी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची अतिरिक्त आयुक्त अश्विनकुमार मुदगल व विक्रम कुमार यांच्यासह अभियंता व इतर अधिकारी उपस्थित होते.

## नियमापेक्षा कमी युनिट रक्तसंकलन करणाऱ्या रक्तपेढ्यांना एसबीटीसीचे पत्र

**मुंबई :** राज्यातील अनेक सरकारी आणि महापालिकेच्या रक्तपेढ्यांकडून दरवर्षी किमान २ हजार युनिट रक्तसंचयनाचे लक्ष्यही पूर्ण होत नसल्याचे समोर आले आहे. याबाबत राज्य रक्त संक्रमण परिषदेने (एसबीटीसी) २५ ते ३० रक्तपेढ्यांना नोटीस बजावली असून, संकलन वाढवण्याच्या सूचना दिल्या आहेत. यात मुंबईतील कांदिवली येथील शताब्दी बीडीबीए, सांताक्रूज येथील व्हि. एन. देसाई, बांद्र्याच्या भाभा रुग्णालयातील रक्तपेढ्या तसेच राज्य सरकारच्या अधिपत्याखालील कामा आणि जी. टी. रुग्णालयाच्या रक्तपेढ्यांचाही समावेश आहे. राष्ट्रीय रक्त संक्रमण परिषदेनं (एनबीटीसी) सर्व रक्तपेढ्यांसाठी दरवर्षी किमान २००० युनिट रक्तसंकलनाचे निर्देश जारी केले आहेत. अनेक रक्तपेढ्यांमध्ये संकलनाची स्थिती असमाधानकारक आहे. त्यामुळे अशा केंद्रांनी स्वेच्छा रक्तदान शिबिरे राबवून संकलन वाढवावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

# राज्यात ३ ते ९ ऑक्टोबर दरम्यान 'अभिजात मराठी भाषा सप्ताह'

**मुंबई: पुढारी वृत्तसेवा**

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला तो दिवस ३ ऑक्टोबर आता 'अभिजात मराठी भाषा दिवस' म्हणून साजरा केला जाणार आहे. त्याचबरोबर ३ ते ९ ऑक्टोबरदरम्यान अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. अभिजात मराठी भाषा दिवस आणि अभिजात मराठी भाषा सप्ताहामध्ये राज्यस्तरीय उपक्रम, बृहन्महाराष्ट्रस्तरीय उपक्रम आणि जिल्हा, तालुका व ग्रामस्तरीय उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

मराठी भाषेला अभिजात दर्जा देताना मराठी भाषेची गेल्या सुमारे २५०० वर्षांची परपंरा गृहीत धरण्यात आली आहे. मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, भाषेचे संवर्धन होण्यासाठी, जनमानसामध्ये मराठी भाषेच्या अभिजाततेची ओळख व्हावी, अभिजात मराठी भाषेसंदर्भातील संशोधन, जनजागृती जास्तीत जास्त व्हावी याकरिता प्रतिवर्षी ३ ऑक्टोबर दिवस 'अभिजात मराठी भाषा दिवस' साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे मराठी भाषा विभागाने शासन अध्यादेशाद्वारे जारी केले आहे.

यामध्ये अभिजात मराठी भाषेसंदर्भात तज्ज्ञ व्यक्तींचे व्याख्यान, चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळा, शिबिरांचे आयोजन करणे, ताम्रपट आणि शिलालेखांसह अभिजात मराठी ग्रंथांचे प्रदर्शन भरविणे, प्राचीन ग्रंथसंपदेचे समकालीन मराठीमध्ये अनुवाद केलेल्या पुस्तकांचे प्रदर्शन आणि विक्री करणे. अभिजात मराठी ग्रंथसंपदेचे डिजिटायझेशन करून त्यांची शाळा, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना ओळख करून देणे.

शाळा, महाविद्यालये, तसेच शासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेसंदर्भात प्रश्नमंजूषा, निबंधलेखन, वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करणे आदी गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे.

### ३ ऑक्टोबर 'अभिजात मराठी भाषा दिवस' होणार साजरा



### अशी असेल कार्यक्रमाची रूपरेषा

- **३ ऑक्टोबर :** अभिजात मराठी भाषा सप्ताहामध्ये अभिजात भाषा संदर्भातील घेण्यात आलेल्या मुलाखतींच्या पुस्तकाचे प्रकाशन मुंबई येथे होईल. त्याचबरोबर अभिजात मराठी भाषा दिवसाचे औचित्य साधून विविध ग्रंथांचे प्रकाशन करण्यात येणार आहे.
- **४ ऑक्टोबर :** 'ऑनलाईन मराठी: दशा आणि दिशा' या विषयावर मुंबई येथे परिसंवाद. यामध्ये या क्षेत्रात काम करणारे तज्ज्ञ उद्योजक व अभ्यासकांचा समावेश असणार आहे.
- **५ ऑक्टोबर :** 'अभिजात मराठी भाषेबाबत महाराष्ट्र शासनाच्या भविष्यातील योजना' या विषयावर मुंबई येथे परिसंवाद घेण्यात येणार आहे. मराठी भाषा विभागाचे मंत्री सचिव, मराठी भाषा समितीचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष यांचा सहभाग आहे.
- **६ ते ८ ऑक्टोबर :** अमरावती येथे ११ भारतीय अभिजात भाषांच्या तज्ज्ञ मंडळींचे संमेलनाचे आयोजन केले आहे. या संमेलनाचे आयोजन कुलगुरू, मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर, अमरावती यांच्याकडून करण्यात येणार आहे.
- **९ व १० ऑक्टोबर :** प्रत्येक तालुक्यातील २ अशा सुमारे ७५० मराठी भाषा अधिकाऱ्यांसाठी छत्रपती संभाजीनगर येथे दोन दिवसांच्या संमेलनाचे आयोजन जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून करण्यात येणार आहे.

# बाल हक्क संरक्षण आयोगात अध्यक्ष, सदस्यांची होणार नियुक्ती

## राज्य सरकारकडून नामांकने मागविण्याची जाहिरात प्रसिद्ध

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगात अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी अखेर महिला व बाल विकास विभागाने १७ जुलै रोजी राज्यातून नामांकने मागविण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. यामुळे राज्य बाल हक्क संरक्षण आयोगात अध्यक्ष व सदस्यांच्या नेमणूकीचा मार्ग मोकळा झाला आहे. या नेमणुकीसाठी नामनिर्देशित अर्ज करण्याची जाहिरात महिला व बाल विकास विभागाकडून प्रसिध्द करण्यात आली.

गेल्या दोन महिन्यांपासून राज्य बाल हक्क संरक्षण आयोगात अध्यक्ष व सदस्यांची पदे रिक्त होती. यामुळे राज्यातील बालकांची सुरक्षा आणि संरक्षण ऐरणीवर आले होते. दै. पुढारीने १३ जुलै २०२५ रोजी 'राज्य बाल हक्क संरक्षण आयोग रामभरोसे! अध्यक्ष, सदस्यांच्या नेमणुकांचा सरकारला विसर' असे वृत्त प्रसिध्द केले होते.

या वृत्तांची दखल राज्य सरकारने घेवून या आयोगात अध्यक्ष, सदस्यांची नियुक्ती करण्यासाठी नामनिर्देशित अर्ज करण्याची ७ दिवसांची मुदत देण्यात आली आहे.




मुंबई : १३ जुलै रोजी दै. पुढारीने प्रसिद्ध केलेले वृत्त.

### निवडीची अर्हता

- अध्यक्ष - १ आणि सदस्य -५ असे एकूण ६ सदस्यांची नेमणूक करण्यात येईल. यात एक प्रतिष्ठित व्यक्ती बालकांच्या कल्याण व विकासासाठी निगडित अतिउत्कृष्ट कार्य करणारी व्यक्ती असावी, त्यांची शैक्षणिक पात्रता ही किमान पदवीधर असावी.

### याठिकाणी अर्ज करा

- जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, २८- राणीचा बाग, जुना सर्किट हाऊस जवळ, पुणे -१ या ठिकाणी सादर करण्याचे आवाहन करण्यात आले.

या आयोगात १ अध्यक्ष आणि ५ सदस्य असे एकूण ६ पदे आहेत. यामध्ये किमान २ महिला सदस्यां असतील. यासाठी दोन वेळा अध्यक्ष/सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात आलेली व्यक्ती पुन्हा पात्र राहणार नाही. तर सदर नियुक्तीचा कालावधी हा तीन वर्षांचा असेल. गेल्या दोन महिन्यांपासून राज्य बाल हक्क संरक्षण आयोगात अध्यक्ष व सदस्यांची पदे रिक्त होती.

# डोंबिवलीत उघड्या चेंबरमध्ये पडून वृद्धाचा मृत्यू

**सापाड : पुढारी वृत्तसेवा**

डोंबिवलतीतील टाटा पॉवर नाका परिसरातील गांधी नगरजवळ एमआयडीसीच्या उघड्या चेंबरमध्ये पडून एका इसमाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. बाबू धर्मा चव्हाण (६०) असे मताचे नाव आहे.



बाबू चव्हाण हे रस्त्याने चालत असताना त्यांच्या पायाखालची जमीन सरकली आणि ते थेट एमआयडीसीच्या उघड्या चेंबरमध्ये कोसळले. या घटनेत त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना डोंबिवलीतील एका खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यामुळे एमआयडीसी परिसरातील नागरिकांचा सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या भागातील रहिवाशांनी यापूर्वी अनेकदा रस्त्यावर असलेल्या उघड्या चेंबरबाबत प्रशासनाकडे तक्रारी केल्या होत्या. मात्र एमआयडीसीने सातत्याने दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. वडिलांना वेळेवर योग्य उपचार मिळाले असते, तर त्यांचा जीव वाचू शकला असता. हे दुर्लक्ष नव्हे तर थेट जीव घेणारी निष्काळजीपणा आहे. असा आरोप बाबू चव्हाण यांच्या मुलाने केला आहे.

PRIME FOCUS LIMITED

**प्राइम फोकस लिमिटेड**

**कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर (सीआयएन) :** L92100MH1997PLC108981
**नोंदणीकृत कार्यालय :** प्राइम फोकस हाऊस, सिटी बँकेच्या समोर, लिंकिंग रोड, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२. **दूरध्वनी :** ०२२-२६४८ ४९००.
**वेबसाइट :** www.primefocus.com, **ई-मेल :** ir.india@primefocus.com

**विशेष सर्वसाधारण सभेच्या सूचनेचे शुद्धिपत्रक**

व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ("**व्हीसी**")/अदर ऑडिओ व्हिज्युअल मीन्स ("**ओएव्हीएम**") च्या माध्यमातून **शनिवार, दि. २६.०७.२०२५ रोजी स. ११.३० वाजता (भा. प्र. वे.)** प्राइम फोकस लिमिटेड ("**कंपनी**") ची आयोजित विशेष सर्वसाधारण सभेच्या ("**ईओजीएम सूचना**") सूचनेच्या संदर्भात ("**ईओजीएम**") सदर शुद्धिपत्रकआहे. कंपनी कायदा, २०१३ आणि भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ यांच्या अनुपालनातंर्गत कंपनीच्या सभासदांना यापूर्वीच दि. ०४.०७.२०२५ रोजी ईओजीएमची सूचना पाठवण्यात आली आहे.

नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड व बीएसई लिमिटेड यांच्याकडून सूचना/मते प्राप्त झाल्याच्या अनुषंगाने कंपनीने सूचना तसेच ईओजीएमसूचनेच्या "बाब क्र. १" च्या स्पष्टिकरण अहवालासंदर्भात ईओजीएमसूचनेचे शुद्धिपत्रक ("**शुद्धिपत्रक**") जारी केले आहे.

स्पष्टिकरण स्वरूपात सदर शुद्धिपत्रक जारी करण्यात येत आहे व ते ईओजीएम सूचनेचा अविभाज्य भाग समजण्यात यावा. कंपनीचे भागधारक व अन्य हिस्सेधारकांनी कृपया सदर शुद्धिपत्रकासमवेत ईओजीएमची सूचना वाचावी. येथे नमूद न केलेल्या अन्य ठळक केलेल्या बाबी या ईओजीएम सूचनेसमवेत शुद्धिपत्रकातही त्याच अर्थाने असतील असे समजण्यात यावे.

कृपया नोंद घ्यावी की, ई-मतदान कालावधी सुधारित करण्यात आला आहे व ई-मतदान बुधवार, दि. २३.०७.२०२५ रोजी स. ९.०० वा. (भा. प्र. वे.) सुरू होईल व शुक्रवार, दि. २५.०७.२०२५ रोजी सायं. ५.०० वा. (भा. प्र. वे.) संपेल.

सभासदांना **सोमवार, दि. २१.०७.२०२५ पर्यंत** ई-मेलद्वारे सदर शुद्धिपत्रकाची प्रत पाठवण्यात येईल तसेच ती कंपनीची वेबसाइट www.primefocus.com वर तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) वेबसाइट www.evotingindia.com वर तसेच बीएसई लिमिटेड वेबसाइट www.bseindia.com वर व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाइट www.nseindian.com वरही पाहता येऊ शकेल.

सदर शुद्धिपत्रकाद्वारे स्पष्ट केलेल्या, सुधारित वा पुरवणीत दिलेल्या बाबींव्यतिरिक्त ईओजीएम सूचनेतील अन्य सर्व मजकूर अपरिवर्तित राहील. भागधारकांनी कृपया त्याची नोंद घ्यावी.

**संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे**
**प्राइम फोकस लिमिटेड करिता**
**सही/-**
**परिना शाह**
**कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी**

**ठिकाण :** मुंबई
**दिनांक :** २१.०७.२०२५

# खटाव मिलच्या गिरणी कामगारांना बोरिवलीतील जागेत घरे मिळावीत

## गिरणी कामगार संघर्ष समितीच्या बैठकीत मागणी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

खटाव मिलच्या पात्र गिरणी कामगारांना बोरिवलीच्या जागेवर घरे मिळावीत, अशी मागणी गिरणी कामगार संघर्ष समितीच्या बैठकीत करण्यात आली. बैठकीला अध्यक्ष प्रवीण घाग, प्रवीण येरूनकर, राजन दळवी, मारुती जाधव, अनंत शिंदे आदी उपस्थित होते. खटाव मिल कामगारांचा लवकर जाहीर मेळावा घेऊन पुढील दिशा ठरवली जाईल असे सांगितले.

प्रविण घाग म्हणाले, बोरिवलीतील जागा खटाव मिल गिरणी कामगारांना मिळावी म्हणून ५ ते ६ वर्षे मॉनेटरी कमिटीत व सरकारी दरबारी समितीकडून निवेदने देऊन प्रयत्न चालले आहेत. एमएमआरडीएने या जागेवर दावा केला होता. तेव्हा विकसक स्वयंम रियलेटर (अदानी) यांच्यात न्यायालयीन वाद निर्माण झाला होता. आमच्या जमिनीच्या मागणीनुसार मॉनेटरी कमिटीसमोर या दोघांनी राज्यसरकारच्या धोरणाप्रमाणे कामगारांच्या घरासाठी जमीन देण्याचे लेखी आश्वासन दिले. तसे पत्र एमएमआरडीएने १ फेब्रुवारी २०१७ ला दिले आहे. तेव्हा या दोघांची ही भूमिका लेखी स्वरूपात मॉनेटरी कमिटीकडे ऑनरेकॉर्ड आहे परंतु; २२ मार्च २०२४ ला उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे या जागेवरील सर्व दावे एमएमआरडीएने अचानक मागे घेऊन ही जागा पूर्णपणे खटाव मिल व्यवस्थापकाकडे सुपूर्द केली गेली.

स्वयं रियालेटर यांनी भारतीय रिझर्व बँकेत १४९ कोटी ३० लाख १६ हजार २१३ रुपये रक्कम स्वीकारून ही जागा नगरविकास खात्याच्या ३० ऑक्टोबर २०२३ च्या पत्राप्रमाणे सेक्शन २० खाली या जागेचे हस्तांतर विकासाकडे व खटाव मिल व्यवस्थापनाकडे केले गेले. याबाबत जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी सुशिल खरात आणि नगरविकास अप्पर सचिव राम साबणे यांना निवेदन देऊन चर्चा केली. त्यावेळी डीसीआर ५८ प्रमाणे त्या जागेवरील सर्व तरतूदी संबंधित विकासकाला पूर्ण कराव्या लागतील.



### दोन्ही युनिट मिळून ४,४०७ कामगार

- खटाव गिरणीचे एक भायखळा व दुसरे बोरिवली अशी दोन युनिट आहेत. भायखळा येथे डीसीआर २००३ प्रमाणे जागा मिळाली नाही. बोरिवलीत ४० एकर मोकळी जागा आहे. या जमिनीला डीसीआर ५८ खटाव मिलची जागा म्हणून आधीपासून लागू आहे. या जागेपैकी २००३ डीसीआर ५८ प्रमाणे १३ एकर जागा कामगारांच्या घरासाठी मिळालीच पाहिजे. येथे दोन्ही युनिट मिळून ४,४०७ कामगार पात्र आहेत.

# मच्छीमारांच्या 'करेंगे या मरेंगे' मोर्चाला तूर्तास स्थगिती

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मासळी व्यवसायाचा आर्थिक केंद्र बिंदू असलेल्या मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केट येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज मासळी मंडई स्थलांतराला मच्छीमारांनी तीव्र विरोध दर्शवित मंगळवारी 'करेंगे या मरेंगे' या जनआक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते. त्यात मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी मध्यस्थी करीत यावर चर्चा करून तोडगा काढण्याचे आश्वासन मच्छीमारांना दिल्यानंतर तूर्तास नियोजित मोर्चाला स्थगिती देण्यात आली आहे.

पालघर, ठाणे, मुलुंड, भांडुप, नवी मुंबई, उत्तन, गोराई, मनोरी, मार्वे, मालवणी, वसई, अर्नाळा, वर्सोवा, कुलाबा, कफपरेड, खार दांडा, जुहू येथील कोळीवाड्यांमध्ये सभा आयोजित करून मोर्चाचा निर्धार केला होता. मच्छीमारांनी एकमताने 'करेंगे या मरेंगे' चा नारा देत श्री छत्रपती शिवाजी महाराज मासळी मंडईचे स्थलांतर होऊ न देण्याचा निर्णय घेतला. त्याची दखल घेत मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज मासळी मंडईमधील कोळी महिला व मासळी व्यावसायिक यांना नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या भुयारी मासळी मंडईत स्थलांतरीत करण्याबाबत दोन दिवसांपासून मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली असून त्यावर तोडगा निघत असल्याचे सांगितले. राणे यांनी स्वतः लक्ष घातल्यामुळे येत्या २२ तारखेला निघणारा मोर्चा तूर्तास स्थगित करण्यात आल्याची घोषणा संघटनांकडून केली आहे.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

सहाय्यक आयुक्तांचे कार्यालय, आर/उत्तर प्रभाग, ५ वा मजला, घनकचरा व्यवस्थापन विभाग, रघुनाथ केस्कर मार्ग, रुईया कॉलेज शाळेजवळ, दहिसर (प), मुंबई - ४०००६८

सहा. अभि.(घ.क.व्य.)/२५१८/आर-उत्तर दि. २१/७/२५

**संक्षिप्त ई-निविदा सूचना**

| | |
|---|---|
| विभाग | सहाय्यक आयुक्त आर/उत्तर |
| टेंडर क्र. | 2025_MCGM_1201913 |
| विषय | आर/उत्तर विभागातील विविध रस्ते/फुटपाथ वरील पडलेले ऑड आर्टिकलचे संकलन व वहन करण्याकरिता भाडेतत्त्वावर डंपरचा पुरवठा करण्याबाबत. |
| निविदा-विक्री | 22.07.2025 from 9.00 AM to 28.07.2025 at 9.15 AM |
| वेबसाईट | http://mahatenders.gov.in |
| संपर्क | सहा.अभि. (घ.क.व्य.) आर/उत्तर |
| नाव | श्री. अभिजीत कांबळे |
| दूरध्वनी क्र. | 9969825654 |
| ई-मेल आयडी | ae01swm.rn@mcgm.gov.in |

**सही/-**
**सहाय्यक आयुक्त आर/उत्तर**

**PRO/1069/ADV/2025-26**

झाडे लावा, झाडे जगवा.

# पवई तलावात विसर्जनबंदीसाठी पर्यावरणप्रेमी आग्रही

## कृत्रिम तलावांना प्रोत्साहन देण्याची मुंबई महानगरपालिकेला विनंती

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई : पवई तलाव स्वच्छतेसाठी महापालिका दिवसरात्र काम करीत असून कोटयवधी रूपये खर्च करीत आहेत. तलावात दररोज १८ दशलक्ष लिटर प्रक्रिया न केलेले सांडपाणी भरत असल्याचे महापालिकेनेच मान्य केले आहे. त्यामुळे हा तलाव प्रदूषणमुक्त होण्यासाठी येथे विसर्जनावर बंदी घालावी अशी आग्रही मागणी पर्यावरणप्रेमींनी केली आहे.

ॲडव्हान्स्ड लोकॅलिटी मॅनेजमेंट (एएलएम) ग्रुपच्या अध्यक्षा पामेला चीमा यांनीही याबाबत खेद व्यक्त केला आहे. हार्वेस्टर वापरुन तलाव स्वच्छ करण्याची प्रक्रिया सुरू आहे. जी तलावाच्या जैवविविधतेसाठी हानिकारक असून तलावात वाढणाऱ्या जलपर्णी स्वच्छ करण्यात प्रशासन अपरे पडत असल्याचे चीमा यांनी सांगितले. गणेशोत्सवाला एक महिना उरला असल्याने नॅटकनेक्टने पोलिस आणि महानगरपालिका आयुक्तांना ईमेल पाठवून याबाबत मार्गदर्शक तत्त्वे आत्ताच तयार करावीत अशीही विनंती केली आहे. पवई तलावातील घाणेरड्या पाण्यात मूर्तींचे विसर्जन करावे लागते, याचे आम्हाला खूप वाईट वाटते, असे एएलएमचे सदस्य आणि हिरानंदानी गार्डन्सचे रहिवासी मिलन भट यांनी सांगितले तर मोठ्या मूर्ती तलावात विसर्जीत करू नयेत, असे पवईतील रहिवासी गीतांजली धुळेकर यांनी सांगितले.



"नॅटकनेक्ट फाउंडेशनने पीएमओच्या संकेतस्थळावर याबाबत तक्रार दाखल केली होती. याला केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने (एमओईएफसीसी) प्रतिसाद देत महाराष्ट्र पर्यावरण संचालकांना आवश्यक कारवाई करावी असे निर्देश दिले आहेत.

**-बी.एम.कुमार,**
संचालक, नॅट कनेक्ट

**पनवेल महानगरपालिका**
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com

**जा.क्र. पमपा/पापुवि/२६२५/प्र.क्र.०२/८४६/२५** **दि. २१/०७/२०२५**

**निविदा सूचना**

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १) | PMC/WS/18/2025-26 | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पनवेल शहरातील (पूर्वाश्रमीचे नगरपरिषद क्षेत्र) पाणीपुरवठा योजनेच्या परिचालनासाठी ३ वर्षाकरिता मनुष्यबळ पुरवठा करणे. | रु. ७,९३,६९,४५२/- |

वरील ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या **'http://mahatenders.gov.in'** या संकेतस्थळावर दि. २२/०७/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**गणेश शेटे**
**अतिरिक्त आयुक्त-१**
**पनवेल महानगरपालिका**